शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज आमंत्रित

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग यांचे कार्यालय,

कक्ष क्र ७२१/७२७, ७ वा मजला, कोकण भवन (विस्तार इमारत) नवी मुंबई - ४००६१४

या कार्यालयाच्या दि.०७/०४/२०२५ रोजीच्या जाहिरातीनुसार शासकीय सेवेतून (गट अ किंवा गट ब) (ग्रेड पे रू.५४००/- किंवा त्यापेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता दि.१७/०४/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. तथापि प्रशासकीय कारणास्तव सदर कालावधीस दि.१५/०६/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय सेवेतून (गट अ किंवा गट ब) (ग्रेड पे रू.५४००/- किंवा त्यापेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | लेखा व अर्थ विषयक बाबी तसेच लेखापरीक्षण कार्यालयीन तपासणी. | १. महाराष्ट्र शासनातील कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील सहायक लेखा अधिकारी किंवा त्यावरील वरीष्ठ पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>२. महाराष्ट्र प्रशासकीय लेखा, वित्त व्यवस्थापन, अर्थसंकल्प, लेखापरीक्षण संदर्भातील अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>३. संगणकीय कामकाज हाताळण्यात निपुणता आवश्यक.<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६३ वर्ष | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/ वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.१५.०६.२०२५ पर्यंत सादर करावेत.

**संपर्क :- राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, ७२१ / ७२७ ७ वा मजला, कोकण भवन (विस्तार इमारत) नवी मुंबई, ४००६१४**

**दूरध्वनी :- २०८७०५१५**

**ई-मेल :-** crts.konkan@maharashtra.gov.in/crtskonkan.alt@gmail.com

(रविंद्र गुरव)
सहसचिव
राज्य सेवा हक्क आयोग
कोकण महसूली विभाग